# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(शिक्षण विभाग)

क्रमांक :2015/शि. वि. दिनांक : 19/06/2014

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा. नागपूर

**विषय :– अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सन 2014–15 करीता प्री–मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ :– 1) शासन निर्णय क्र. पपंका 2007 (270/07) दि. 23 जुलै 2008**
**2) माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनालय/शिष्य 226/अल्पसं 2014–15 दि. 27/05/2014**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या 15 कलमी कार्यक्रमानुसार राज्य शासनामार्फत शासन निर्णय क्रमांक पपंका–2007/(207/07) असंख्य दिनांक 23 जुलै 2008 नुसार राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध व पारशी या अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक इयत्ता 1 ली ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2008–09 पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सन 2014–2015 या शैक्षणिक वर्षापासून केंद शासनाचे पत्र दि 26.2.2014 नुसार जैन समाजाचा अल्पसंख्यांक समाजामध्ये समावेश केलेला आहे. त्यानुसार सन 2014–15 या वर्षासाठी राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवत्ताधारक इयत्ता 1 ली ते 10 वी च्या विद्यार्थ्यांचे केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज शाळास्तरावर भरण्यात यावे.

## <u>शिष्यवृत्ती पात्रतेच्या अटी</u>

1) सदर योजना राज्यातील इ. 1 ली ते 10 वी च्या सर्व शासकीय/निमशासकीय/मान्यता प्राप्त खाजगी अनुदानीत/विनाअनुदानित कायम विनाअनुदानित शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.
2) अर्जदार विद्यार्थी मागील वर्षी 50% पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेला असावा. इयत्ता 1 ली ते 8 वी साठी सन 2010–11 पासून श्रेणीपद्धती असल्याने क–1 (51 ते 60 टक्के) व त्यावरील श्रेण्या ग्राहय धरल्या जातील.
3) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रूपये 1.00 लाखापेक्षा कमी आहे असे विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.
4) प्राप्त अर्जामध्ये ज्यांचे वार्षिक उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
5) इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यासाठी केवळ वार्षिक उत्पन्नाची अट लागू राहील.
6) एका कुटुंबातील 2 पेक्षा जास्त मुलांना शिष्यवृत्ती मिळणार नाही.
7) सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही तत्सम योजनेचा लाभ घेता येणार नाही.

8) सदर शिष्यवृत्तीमध्ये 30 टक्के शिष्यवृत्ती ही विद्यार्थिनींसाठी राखीव राहील.

9) सन 2013–14 मध्ये नवीन व नूतनीकरणाने पात्र झालेल्या आणि शिष्यवृत्तीच्या अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. नूतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन न भरल्यास त्यांचे शिष्यवृत्तीचे नूतनीकरण होणार नाही. त्यांनी नवीन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

10) ऑनलाईन अर्ज भरतांना विद्यार्थ्यांचा धर्म व कुटुंबांच्या उत्पन्नाची माहिती भरावी. तथापि विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरल्यानंतर उत्पन्न व धर्माबाबत आवश्यकतेनुसार पुरावे सादर करावे लागतील.

11) कुटुंबाचे उत्पन्न नमूद करतांना ते अचूक असल्याची खात्री करून घ्यावी. उत्पन्नाबाबत कोणत्याही स्तरावर तपासणी करण्यात येईल. उत्पन्न चुकीचे भरल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. उत्पन्न चुकीचे भरल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

12) या शिष्यवृत्तीसाठी www.school.maharastra.gov.in या संकेतस्थळावरून अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापकांनी ऑनलाईन दि. 16.06.2014 पासून दिनांक 16.08.2014 रोजी दुपारी 05.00 वाजेपर्यंत दाखल करावेत.

13) चुकीचे/अपूर्ण भरलेले, ऑनलाईनशिवाय इतर मार्गाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**टिप :–** आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरून खालील दिलेल्या तक्त्यात वर्गनिहाय व धर्मनिहाय मुला–मुलींची माहिती आपल्या झोनच्या शाळा निरीक्षकाकडे दिनांक 18.08.2014 पर्यंत जमा करावी. तसेच सन 2013–14 मध्ये किती विद्यार्थ्यांची आवेदन पत्र ऑनलाईन भरण्यात आले व किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली. त्याबाबतची माहिती सुद्धा खाली दर्शविलेल्या तक्त्यामध्ये भरून शाळा निरीक्षकांकडे जमा करावी.

| अ. क्र. | वर्ग | एकूण पट | मुस्लिम | | बौद्ध | | ख्रिश्चन | | शिख | | पारशी | | जैन | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | एकूण |

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी :–
1) मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर
2) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर
3) मा.सहा. शिक्षणाधिकारी (माध्य.) म.न.पा. नागपूर
4) शाळा निरीक्षक झोन 1 ते 10, म.न.पा. नागपूर
5) उन्नत केंद्र समन्वयक (1 ते 3) म.न.पा. नागपूर

PC 2:D:\SRW\A4 Letter 1.doc